रे.दि.मु.नं.१४/२०१९
नि.क्र.९२ लगत

**<u>वादीतर्फे साक्षीदार सौ. अलका मोहन भोसले यांचा पुढील सरतपास वादीतर्फे वकील श्री. ए. सी आठल्ये यांच्याकडून शपथेवर सुरु-</u>**

**३.** मी दि. ०६/०१/२०२२ रोजी देवरुख येथील नोटरी वकील गिडये यांच्याकडे स्वतः उपस्थित राहून एक प्रतिज्ञापत्र करुन दिले होते. मला आता दाखविलेले प्रतिज्ञापत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाण ९४** देण्यात येते.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील श्री. सी. एम. मांगले यांचेकडुन शपथेवर सुरु</u> -**

**४.** हे म्हणणे खरे आहे की नि. ९३ च्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा मी दाखल केलेल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील मजकुरासारखाच आहे. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही प्रतिज्ञापत्रात माझे माहेरचे पूर्ण नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही प्रतिज्ञापत्रात माझ्या आईचे सासरचे आणि माहेरचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या प्रतिज्ञापत्रात मंदाकिनी लाड यांच्या आईचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिज्ञापत्रात माझ्या आईच्या आईचे व मंदाकिनीच्या आईच्या आईचे माहेरचे व सासरचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की याकामी मी माझे यांच्याशी नातेसंबंध दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिज्ञापत्रात माझे दत्तात्रय किंवा दत्ताराम लाड यांच्याशी थेट नाते दर्शवेल असा मजकूर नमुद केला नाही. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी मी माझे वादी व प्रतिवादी

यांच्याशी असलेले संबंध शाबीत करण्यासाठी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की नातेसंबंध सिध्द करताना या सर्व गोष्टी महत्वाच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे उलटतपासात विचारलेले सर्व नातेसंबंध माझ्या दोनही प्रतिज्ञापत्रात नमुद असणे गरजेचे होते ते तसे का नमुद नाहीत हे मला सांगता येत नाही.

**५.** हे म्हणणे खरे आहे की चंद्रशेखर गजानन शिंदे, वादी हा माझा जावई आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्यानुसार नातेसंबंध शाबीत करायला मी आज रोजी साक्ष देत आहे. वादीच्या मुलाचे नाव ऋग्वेद चंद्रशेखर शिंदे आहे. वादीच्या भावाचे नाव निलेश गजानन शिंदे व त्याला एक मुलगी आयुषी व एक मुलगा त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ च्या मुलीचे नाव पूर्वा आणि मुलाचे नाव कल्पेश आहे. प्रतिवादी क्र. २ च्या मुलाचे नाव चिराग आहे.

**६.** हे म्हणणे खरे आहे की मी हिंदु मराठा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी मुलगी नुतन आणि मंदाकिनीचा मुलगा चंद्रशेखर, वादी नात्याने मावस भावंडे लागतात. हे म्हणणे खरे आहे की वादी हा नुतनचा नवरा आहे. हे म्हणणे खरे आहे की हे ठरवून झालेले लग्न आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या समाजात मावस भावंडामध्ये लग्न करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात नमुद केल्याप्रमाणे नातेसंबंध खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या भावाने देखील वादीच्या वतीने साक्षीदार म्हणून या न्यायालयात साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की त्याच्या उलटतपासात ज्या काही त्रुटी होत्या त्या पूर्ण करण्यासाठी आज रोजी मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की मला वादीकडून दावा मिळकतीची माहिति मिळाली. माझ्या

म्हणण्याप्रमाणे वादीला दावा मिळकतीत हिस्सा मिळाला पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या म्हणण्यानुसार मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

सही/-
(श्रुती ह. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवरुख

दि. ०१/१२/२०२३